# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | – | संत श्री गाडगे महाराज, |
| | | – | कै. द. दि. परचुरे यांना आदरांजली |
| २) | गाठी-भेटी – श्री. काटे महाराज | – | श्री. सूर्यकांत गर्जे, |
| ३) | तुमचे साईबाबांविषयी सामान्यज्ञान | – | श्री. माधव गोरे |
| ४) | माझी श्रद्धास्थाने | – | डॉ. के. भ. गव्हाणकर. |
| ५) | युगावतारी श्रीसाईबाबा | – | श्री. चंद्रकांत सामंत |
| ६) | अजानबाहू श्रीसाई | – | डॉ. अनिल जायस्वाल |
| ७) | साईबाबा आणि माझी एम. ए. | – | कु. पुष्पलता मोहरे |
| ८) | तयांस पूर्ण अंतर्ज्ञान | – | श्री. विलास शं. वैद्य |
| ९) | ब्रम्हीभूत सच्चिदानंद स्वामी महाराज | – | श्री. गणेश विष्णू कविटकर |
| १०) | वाचकांचा पत्रव्यवहार. | – | – |
| ११) | त्रैमूर्ती श्रीसाई | – | श्री. गणपत गोविंद सामंत |
| १२) | ग्रंथभेट | – | श्रीसाईनंद |
| १३) | शिरडीवृत्त | – | श्रीराम नवमी उत्सव-कार्यक्रम |
| १४) | पसायदान | – | श्री. सदाशिव विठ्ठल गर्दे |
| १५) | साईमहती | – | श्री. रमेश डी. चव्हाण |
| १६) | प्रणाम | – | श्री. गं. रा. भट |
| १७) | मागणे लई नाही | – | श्री. शंकर इमानदार |
| १८) | पाऊले वळली शिरडीला | – | श्री. गजानन मो. दर्णे |
| १९) | ध्यानसाईचे सुंदर | – | श्री. ह. भ. सावंत |
| २०) | श्रीसाई दरबार | – | श्री. दत्ताराम मोरे |
| २१) | दीनानाथ दयाके सागर | – | श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री सा ई वा क्सु धा

'मरा मरा' उलटे म्हणतां
राम प्रकटला जिव्हेवरता ।
जन्मा आधीच अवतार चरिला ।
जाहला लिहिला रामाचे ॥१८३॥
रामनामें पतित पावन ।
रामनामें लाभ गहन ।
रामनामें अभेद भजन ।
ब्रम्हसंपन्न या नामें ॥१८४॥
रामनामाच्या आवर्तनें ।
उठेल जन्ममरणांचे धरणें ।
एका रामनामाचिया स्मरणें ।
घोटिगुणे हे लाभ ॥१८५॥
जेथें रामनामाचे गर्जन ।
फिरे तेथे विष्णूचे सुदर्शन ।
करी कोटी विघ्नांचे निर्दलण ।
दीनसंरक्षण नाम हे ॥१८६॥
साईंस उपदेशा न स्थळ ।
नलगे समय काळवेळ ।
बसतां उठतां चालतां निखळ
सहजचि सकळ उपदेश ॥१८७॥
—श्रीसाईसच्चरित् अध्याय १९ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे] जून ७६ [अंक ३

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ १२ ६१

# संपादकीय

महाराष्ट्राचे आधुनिक तुकाराम संत श्रीगाडगे महाराज यांना जन्मून यंदा शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. शासकीय पातळीवरून या थोर संताचे पुण्य स्मरण करण्यात येत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. या निमित्याने संत गाडगे महाराज प्रतिष्ठानची पण स्थापना करण्यात येत आहे ही खरोखरीच उल्लेखनीय अशी घटना आहे.

आपला भारत ही देवभूमी आहे. आमच्या महाराष्ट्रात संत परंपरा फार पूर्वापार चालत आलेली आहे. दिडशे वर्षाच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र झाला खरा, पण त्याला कारण गोऱ्या सरकारचा उदारपणा नव्हे तर भारतीयांनी केलेल्या स्वातंत्र्य युद्धाचे ते एक गोड फळ आहे व त्याप्रित्यर्थ असंख्य देशभक्तांना आपल्या प्राणाचे बलिदान करावे लागलेले आहे. ज्या महाभागानी वेळोवेळी झालेल्या स्वातंत्र्य संग्रामात, यज्ञात आपल्या सर्वस्वाची आहुती दिली त्या थोर देशभक्तांना आपण कधीच विसरणार नाही. परंतु या देशभक्ताना ज्यांनी सतत शुद्ध रक्ताचा पुरवठा केला त्या संतांची आठवण आपण देशभक्तांच्या बरोबरीनेच ठेवली पाहिजे. कारण त्यांनीच धर्म व देश यांची आठवण विसरलेल्या गुलाम भारतीयाना आपल्या अमृतवाणीने देऊन जागे केले व बहुजन समाजात विलक्षण क्रांती करून समाजावर अनंत उपकार केले आहेत. अशाच प्रकारची अपूर्व कामगिरी बजावून साऱ्या महाराष्ट्रीय जनतेला स्फूर्ति देऊन आकर्षित करणारे जे एक वयोवृद्ध संत होऊन गेले तेच आपले गाडगे महाराज होत.

गाडगे महाराजांचे खरेखुरे नाव होते डेबुजी. वऱ्हाडातील अमरावती तालुक्यातील कोते गावी डेबुजीचा जन्म इ. स. १८७६ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजा व आईचे नाव सखुबाई. डेबुच्या वयाच्या आठव्या वर्षी झिंगराजाने परलोकगमन केले. त्यामुळे त्याच्या आईने मूर्तिजापूर तालुक्यातील दापुर या आपल्या माहेर असलेल्या गावी आपले घर हलविले. याच गावी किशोर डेबुजी खेळला, रमला व लहानाचा मोठा झाला. आपल्या भावी कार्याचा श्रीगणेशा त्यांनी तेथेच सुरू केला. गुराढोरावर लहानग्या डेबुजीचे भारी प्रेम. येथे तो गुरेढोरे वळवीत असे. गाईबैलांची निगा, त्यांच्यासाठी दाणा वैरण पाणी, त्यांच्या रहाल्या जागेची सफाई इत्यादी कामे मोठ्या हौसेने डेबुजी करीत असे. त्याकरिता तो रोज पहाटे उठत असे. याचवेळी त्याची मामी कौतिकाबाई पण दळण कांडणासाठी उठायची. ती जात्यावर जी गाणी गुणगुणत असे ती सहाजिकच गोठा साफ करीत असलेल्या डेबूच्या कानावर पडत व अर्थातच सारा दिवसभर ती गाणी गुणगुणण्याचा नाद त्यास लागला. नदीकाठी गुरेढोरे घेऊन गेले की आपल्या बरोबरीच्या गुराख्यांना, सोबत्याना जमवून ही गाणी

# संपादकीय

## -संत श्रीगाडगे महाराजांचे पुण्यस्मरण-



म्हणण्याचा त्याचा भजनी कार्यक्रम होऊ लागला. जन्मतःच त्याचा आवाज भरदार असल्याने इतर गुराखी पण जमा होऊन त्याला एक सुराने साथ देत व प्रसंगी रिकाम्या घासलेटच्या डब्याचा तबल्यासारखा व दगडांचा टाळासारखा वापर होई; व त्याच्या त्या कीर्तनात ते समरस होत. या भजनी कार्यक्रमाची समाप्ती गावातून भिक्षा मागून आणलेल्या अन्नप्रसादाने होत असे. अशा प्रकारे हा भजन कार्यक्रम डेबूजीचा जो सुरू झाला तो अगदी त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत.

डेबुजीचे लग्न त्याच्या वयाच्या सोळाव्या वर्षी म्हणजे १८९२ साली कमालपूरच्या धनाजी पाटलाची कन्या कुंताबाई हिजबरोबर झाले व तिच्यापासून त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव अलका. अलकाच्या बारशाच्यावेळी डेबुजींनी इतर शिरस्त्याप्रमाणे दारू व मटणाचे जेवण गावास न देता बुंदीच्या लाडवांचे जेवण देऊन साऱ्याच निमंत्रिताना चाट केले, व पूर्वापार चालत आलेल्या गावच्या अंधरूढीना असा एकदम फाटा दिला.

अलकाच्या जन्मानंतर सुमारे आठ-नऊ वर्षाची गोष्ट तेथील आपल्या शेतात काम करीत असताना डेबुजीला एक धिप्पाड व बळकट शरीरयष्टीची गर्द दाढीमिशा व जटा वाढविलेली चमकदार अंगकांतीची एक विचित्र व्यक्ती दिसली. लंगोटी खेरीज त्या व्यक्तीच्या अंगावर काहीच वस्त्र नव्हते. आधीच साधुसंतांच्याबद्दल आत्मीयता बाळगणाऱ्या डेबूने त्या व्यक्तिला पहाताच साष्टांग नमस्कार घातला. उठताच त्या दोघांची दृष्टादृष्ट झाली. दापुरीच्या त्या पूर्णा नदीच्या काठी त्या दोघानी एकत्र भोजन पण केले. परंतु ती भेटलेली व्यक्ती कोण, कुठली, कुठून आली व अखेरीस कुठे गेली याचा थांगपत्ता गाडगेबाबांना आपल्या हयातीत काही झाला नाही. आश्चर्याची गोष्ट अशी की, या घटनेनंतर मात्र डेबुजींच्या रहाणीत व वृत्तीत एकदम फरक पडला. नित्याची कामे त्याच्या हातून पार पडेनात व सारा दिवस गूढ चिंतनात व्यग्र असल्याचे आढळून आले.

त्यानंतर बाबा दापुरीहून तीन मैलावर असलेल्या ऋणमोचन गावी भरलेल्या एका जत्रेस सहकुटुंब गेले होते. या यात्रेहून परतल्यावर तर त्यांची गूढ चिंतनावस्था अधिकच दिसू लागली आणि अखेरीस १९०५ च्या फेब्रुवारीच्या पहिल्याच दिवशी भल्या पहाटे त्यांनी साऱ्या कुटुंबाचे निद्रीस्त अवस्थेत दर्शन घेऊन संसार त्याग केला.

१९०५ ते १९१२ पर्यंत ते साधकावस्थेत होते. या काळात त्यांनी षड्‌रिपूवर विजय मिळविला. त्यांच्या अंगावरच्या कपड्यांच्या या काळात चिंध्या चिंध्या झाल्या होत्या व त्या तशा अवस्थेत फिरताना लोक त्यांना चिंध्या

महाराज म्हणून ओळखू लागले. गोकर्ण महाबळेश्वरकडे तर गाडगे महाराज म्हणजे चिंध्या महाराजच असे ऐकीवात येऊ लागले. बाबा एका हातरीवर बसून भजन-कीर्तन करीत म्हणून नागपूरकडील लोक त्यांना 'चापरे बुवा' या नावाने संबोधित. कोकणात त्यांची वस्त्रे गोधड्यांची असत म्हणून तिकडे त्यांना 'गोधडे महाराज' या नावाने लोक ओळखीत. सातारा जिल्ह्यात त्यांना लोटके महाराज तर वऱ्हाडात ते डेबुजी बाबा या नावाने साऱ्यांच्याच परिचयाचे झाले होते. मुंबई-पुण्याकडील लोक त्यांना 'गाडगे महाराज' या आदरार्थी नावाने हाक मारीत.

१९०५ साली गाडगेमहाराज जे घराबाहेर पडले ते १९५६ पर्यंत म्हणजे ५१ वर्षे बाहेरच होते. बाहेर राहून जनहितासाठी, जनोद्धारासाठी अक्षरशः ते अखेरपर्यंत झटले. आपल्या सुश्राव्य भजनामुळे व किर्तनांद्वारे जनमनावर त्यांनी विलक्षण पकड बसविली होती. त्यांचे सुरस व सरस भजन ऐकावयास मिळणे ही गोष्ट महाराष्ट्रीयांना मोठ्या भाग्याची वाटत असे. खुल्या मैदानात भजन करण्याच्या पाठीमागे त्यांचा एक हेतू होता तो म्हणजे उघड्या जागेत स्पृश्यास्पृश्य एकत्र जमत व ते एक दिलाने जमत हे विशेष होय. त्यांच्या भजन किर्तनास अफाट गर्दी होत असे व त्यांची रसाळ वाणी ऐकण्यासाठी साऱ्यांचीच श्रवणेंद्रिये उत्सुक झालेली असत. त्यांची सार्वजनिक क्षेत्रातली सफाईची कामगिरी तर साऱ्यांनीच गौरविली आहे.

अलकानंतर गाडगेबाबांना एक मुलगी झाली तिचे नाव कलावती. आणखीन पुढे एक मुलगा झाला. त्याचे नाव मुगद्ल पण तो अल्पायु ठरला. त्याची चिरंतन स्मृती म्हणूनच की काय बाबांनी ऋणमोचन येथील एका शंकराच्या देवळाला 'मुग्दलेश्वर' असे नाव दिले. मुगद्लनंतर त्यांना आणखीन एक मुलगा झाला त्याचे नाव गोविंद. तो कुत्रा चावून मरण पावला.

श्रीसंत गाडगेबाबा उत्तमपैकी वक्ते होते. मराठी व हिंदी या दोन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ते पुरोगामी विचारसरणीचे होते. त्यांच्याकडे सोंगाढोंगाला स्थान नव्हते. बुवाबाजीचा तर त्यांना विलक्षण तिटकारा होता. हिंदुधर्म व भारतीय संस्कृतीचे ते विलक्षण अभिमानी होते. सर्व धर्मातील उदात्त तत्त्वांना ते मान देत. भारतीय म्हणून इतर संस्कृतीची ते कधीच टवाळी करीत नसत. भारतात किंवा अखिल विश्वात जे जे काम म्हणून चांगले आहे ते ते मानवाच्या कल्याणासाठी आहे असा त्यांचा समज होता, व त्याचा प्रचार-प्रसार ते सर्वत्र करीत, अगदी स्वतः करीत. ते कुणालाही पाया पडू देत नसत अगर कुणाचाही हस्तस्पर्श करून घेत नसत. त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आपल्या भक्तांच्या सुखसोयीसाठी धर्मशाळा स्थापन करून क्षेत्रस्थानी

येणाऱ्या भक्तांची सोय करून ठेवली आहे. हे भक्तांवर त्यांनी फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. संत गाडगे बाबांनी अनेक चमत्कारही करून दाखविलेले आहेत. एकाचवेळी दोन ठिकाणी प्रचंड जनसमुदायापुढे त्यांनी किर्तने केली होती!

१९५८ साली हा थोर संतश्रेष्ठ अनंतात विलीन झाला. त्याच्या जन्म-शताब्दी प्रित्यर्थ त्याला अमुचे लाख लाख प्रणाम.!

## भावपूर्ण आदरांजली

श्रीसाईलीला मासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक प्रा. द. दि. परचुरे ह्यांना दि. १ जून १९७३ ला सकाळी हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांचा दुःखद अंत झाला. प्रा. परचुरे हे एक थोर साईभक्त होते, व त्यांनी साईलीला मासिकाची पुनर्रचना करून त्याला सध्याचे स्वरूप देण्यासाठी खूपच मेहनत घेतली होती. साईलीला मासिक अधिकाधिक आकर्षक व अद्यावत कसे होईल ह्याची त्यांना कायम विवंचना असे व त्याकरिता त्यांनी श्री. का. सी. पाठक, कोर्ट-रिसीव्हरसाहेब, ह्यांच्या सह-कार्याने जणू काही त्या मासिकाचा कायापालटच घडवून आणला व त्याला लोकप्रियतेचा मार्ग खुला केला.



प्रा. द. दि. परचुरे

साईचरित्राचा मूळात प्रचार व्हावा म्हणून साईचरित्राच्या आधाराने त्यांनी "मुलांचे साईबाबा" हे पुस्तक मराठी व इंग्रजीत लिहिले आणि आता त्याचे कानडी, हिंदी, गुजराती, तेलगू इत्यादि भारतीय भाषांत भाषांतर होत आहे. प्रा. परचुरे ह्यांस त्यांच्या तृतीय श्राद्धदिनी (दि. १–६–७६) आम्ही आमची श्रद्धांजली कृतज्ञतापूर्वक अर्पण करीत आहोत.

–संपादक.

# प. पू. श्री. काटे महाराज

ले. सूर्यकांत गर्जे. पुणे-५



असाच कुठलासा सुट्टीचा दिवस होता. आमचे एक परम स्नेही श्री. रामदास जोशी यांचे घरी सहज गप्पा मारण्यासाठी गेलो होतो. त्यांच्या घरात श्रीसाईबाबांचा नवीनच लावलेला फोटो पाहून मी थोडा आश्चर्य चकित झालो. मनात म्हटले "जोशी बुवा साई-भक्त केव्हा झाले?" माझ्या मनातली चलबिचल ओळखून की काय कोण जाणे, सौ. जोशी वहिनींनी खुलासा केला,

"मारूतीच्या देवळाजवळ जेल क्वार्टर्स आहेत ना, तिथे श्री. काटे महाराज राहतात. ते श्रीसाईबाबांचे फार मोठे भक्त आहेत. त्यांच्या येथे अष्टौप्रहर श्रीबाबांची उपासना चालू असते. त्यांनीच ही श्रीसाईबाबांची प्रतिमा आम्हास दिली आम्ही पण आता श्रीबाबांचेभक्त झालो आहोत."

वहिनींचा हा खुलासा ऐकून मला खूप आनंद झाला आणि श्री. काटे महाराजांबद्दल थोडे कुतुहलही निर्माण झाले.

"मला श्री. काटे महाराजांना भेटावयाचे आहे. मी केव्हा येऊ?" मी मोठ्या आतुरतेने विचारले. तसे श्री. जोशी म्हणाले,

"उद्या संध्याकाळी ६ नंतर या. आपण जाऊ त्यांच्याकडे. जवळच राहतात ते."

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे मी श्री. जोशींना घेऊन श्री. काटे महाराजांच्याकडे निघालो. रस्त्याने जाताना मी कल्पना करू लागलो, काटे महाराज म्हणजे एखाद्या मठासारख्या ठिकाणी एकांतवासात बसलेली एखादी वृद्ध व्यक्ति असावी. परंतु प्रत्यक्ष श्री. काटे महाराजांची व माझी दृष्टादृष्ट झाली तेव्हा माझ्या कल्पनेला पूर्ण तडा गेला. भारदस्त, उंच, चेहऱ्यावर सात्वीकतेचे तेज

असलेले, डोळ्यात गांभीर्याची छटा असलेले. परंतु हसत मुखाने "या, या" खडी साखरेसारखे गोड बोलणारे श्री. काटे महाराज पाहून मी थक्क झालो. माझी व त्यांची ही पहिली भेट.

श्री. काटे महाराज यांचे संपूर्ण नाव श्री. काशिनाथ श्रीराम काटे, परंतु सर्वजण त्यांना आपुलकीने दादासाहेब म्हणतात. ते अजून पन्नाशीच्या घरातहि जाऊन पोहोचलेले नाहीत. पुण्याच्या येरवडा तुरुंगात ते वरिष्ठ लिपीक म्हणून नोकरीस आहेत. श्री. काटे महाराज हे एक कुटुंबवत्सल सद्गृहस्थ आहेत. संसारात राहून परमार्थ साधता येतो याचे बोलके उदाहरण म्हणजे श्री. काटे महाराज. पत्नी, तीन मुली व एक मुलगा असा आटोपशीर संसार सांभाळून श्री. काटे महाराज यांनी अध्यात्मिक क्षेत्रात कमालीची प्रगती साधली आहे. त्यांची पत्नी सौ. शैलजा यांची त्यांना उत्तम साथ लाभली आहे.

श्री. काटे महाराज यांचा जन्म इंदौर येथे एका सुसंस्कृत ब्राम्हण कुटुंबात झाला. पुढे ते कोल्हापूरला येऊन स्थायीक झाले. छोटया काशिनाथला लहानपणीच देव-देवतांची उपासना, धर्म, संस्कृति यांचे बाळकडू मिळाले. दत्ताची आणि गणपतीची व कोल्हापूरच्या जगदंबेची उपासना प्रामुख्याने त्यांच्या घरात होत असे. घरात होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यात वडीलांच्या बरोबरीने छोटा काशिनाथ भाग घेत असे. इतर मुलांप्रमाणे त्याने कधी खाऊ वा खेळणीसाठी हट्ट धरला नाही. उलट काका-मामांनी दिलेला एक-एक पैसा जमा करून गावातल्या श्रीदत्त मंदीरात साडे पाच आणे खर्च करून अभिषेक केला होता.

पुढे वडीलांच्या परवानगीने ते आश्रमात राहू लागले. सुमारे बारा वर्षे त्यांनी दत्ताची कडक उपासना केली. पुढे त्यांना उपरती झाली की श्री साईबाबा हे दत्ताचेच अवतार असून या पुढे त्यांचीच भक्ति व उपासना करीत जा.

श्री. काटे महाराजांनी शिर्डीला येऊन द्वारकामाईत पाच वेळा अनुष्ठाने केली. ते संधी मिळेल तेव्हा तेव्हा शिर्डीला श्री बाबांच्या दर्शनासाठी येत असतात. घरात मधल्या खोलीत त्यांचा 'साई दरबार' आहे. त्या खोलीत बसल्यावर आपण एका संसारी माणसाच्या घरात बसलो आहोत असे मुळी वाटतच नाही. तिथले वातावरण धीर-गंभीर व पवित्र वाटते. श्री. बाबांच्या प्रतिमेपुढे ज्योत मंदपणे तेवत असते. उदबत्तीचा सुगंध सर्वत्र दरवळत असतो. फरशीवर काढलेली रांगोळी व भिंतीवर काढलेला ॐ पाहून मनात आनंदलहरी निर्माण होतात. श्री बाबांच्या पुढे घासून पुसून ठेवलेल्या चकचकीत समया व तांब्या-फुलपात्र पाहून डोळे निवतात. सबंध खोली कशी आरशासारखी स्वच्छ. तेथे वसते फक्त शांतता अन् मंगलता. शिर्डीला समाधी मंदीरात

किंवा द्वारकामाईत बसल्यावर जसे समाधान लाभते अगदी तसेच समाधान या 'साई दरबारात' बसल्यावर लाभते. दररोज सकाळ-संध्याकाळ आरती होत असते. विशेषत: दर गुरुवारी अनेक साई-भक्त इथे जमतात. आरती होते. प्रसाद वाटला जातो आणि साई नामाच्या संकिर्तनात आनंद लुटला जातो.

श्री. काटे महाराज चिंता करतात ती त्यांच्या संसाराची नव्हे तर सर्व भक्तजन सुखी कसे होतील, त्यांना शांती व समाधान कसे लाभेल व श्रीसाई-भक्तीत कुठे कधी उणे राहणार नाहीना याची त्यांना चिंता असते. या संदर्भात एकदा ते म्हणाले –

"श्री साईबाबांची भक्ति मनापासून करावी. श्रध्दा ठेवून करावी. आपण जसे आहोत त्यातच सुख मानावे. ऐहिक सुखाच्या मागे धावणे म्हणजे निव्वळ मृगजळामागे धावण्यासारखे आहे. पारमार्थिक सुख हेच चिरंतन सुख आहे. आणि श्री बाबांच्या सतत चिंतनाने ते प्राप्त होते, इतकेच नव्हे तर वृध्दिंगत होते मग आपणास मन:शांति लाभते. समाधानाचा स्वर्गीय ठेवा सापडतो. अशावेळी जगातल्या सुख-दु:खाची, यशापयशाची माणसाला यत्किंचित सुध्दा पर्वा वाटत नाही. सदा सर्वकाळ तो ब्रम्हानंदी लीन झालेला असतो आणि ही अवस्था टिकविण्यासाठी तुम्हाला भगवत् चिंतनाची आणि मननाची आवश्यकता आहे. श्रीसद्‌गुरु साईनाथ महाराज हे एक अशा पैकी जागृत दैवत आहे जे तुम्हाला अशा अवस्थेप्रत नेऊ शकते."

श्री. काटे महाराज यांची राहणी अगदी साधी आहे. स्नान करताना ते कदापीहि साबण वापरत नाहीत. इतकेच नव्हे तर डोक्याला तेल न लावण्याचा त्यांचा कित्येक वर्षांचा परिपाठ आहे. जेवणसुद्धा अगदी अल्प व सात्वे. ते मितभाषी आहेत. मोजकेच शब्द परंतु ते परिणामकारक ठरतात. नुसताच उपदेश करीत फिरणारे अनेक सापडतील परंतु प्रत्यक्ष कृतीतून दुसऱ्यांना पटवून देणारे क्वचितच आढळतात. श्री काटे महाराज हे त्या पैकी एक होत. रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी आळंदी किंवा अन्यत्र एकांत ठिकाणी जाऊन श्रीबाबांच्या चिंतनात तासन् तास बसून राहणे हा त्यांचा आवडता छंद. जरी त्यांना एकांतवास प्रिय असला तरी साई-भक्त जमले की, त्यांच्या वाचेला कंठ फुटतो, विचाराना पंख फुटतात व भक्तांना भक्तिरसाचे आकंठ रसपान लाभते. अशा वेळी श्री. काटे महाराज आठ-आठ तास बोलत असलेले मी पाहिले आहेत. विचारांना धार आलेली असते. उच्चारात अधिकारवाणी असते. भक्तांनी विचारलेल्या प्रश्नांना ते यथोचित उत्तरे देवून त्यांचे शंका निरसन करीत असतात.

नुकतीच त्यांनी गणपतीची आवर्तने केली. महाप्रसादाचा लाभ अनेक भक्तांनी घेतला. या संदर्भात त्यांनी मजजवळ खुलासा केला — "माझे असंख्य मित्र-मंडळी, नातेवाईक, साई-भक्त, असलेले व पुढे या मार्गात येणारे या सर्वांना सुख-शांती लाभावी, त्यांनी अरिष्टे टळावी व त्यांच्या घरात समाधान नांदावे यासाठी मी ही गणपतीची आवर्तने केली आहेत."

जगाचे कल्याण चिंतणाऱ्या श्री. काटे महाराजांना मी साष्टांग प्रणिपात केला.

● ●

## श्रीसाईनाथ डिरेक्टरी

गेल्या अंकात आम्ही श्रीसाईनाथ डिरेक्टरी म्हणजे श्रीसाईबाबांचे कोण कुठे या संबंधात योजना जाहिर केली होती. परंतु या योजनेस ठिकठिकाणच्या जिल्हयातून चांगला प्रतिसाद मिळाला. भरपूर पत्रे आली परंतु मुंबापुरीतील साईभक्तांनी मात्र द्यावा तसा प्रतिसाद दिलेला नाही. तरी मुंबई व परिसरातील साई भक्तांनी गेल्या अंकी दिलेल्या तक्त्याप्रमाणे आपली सर्व ती माहिती आता शक्य तितक्या त्वरेने मुंबई कार्यालयाकडे पाठवावी व संपूर्णपणे सहकार्य द्यावे ही विनंती.

# तुमचे श्रीसाईबाबांविषयीचे सामान्यज्ञान किती आहे ?

[पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, आठ प्रश्नांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्यासर्व देता आल्यास उत्कृष्ट समजावे.]

(१) साईबाबा जेव्हा प्रथम खंडोबा मंदिरात आले तेव्हा आवो साईबाबा असे म्हणून .......... यांनी त्यांचे स्वागत केले.

(अ) म्हाळसापती, (ब) काशीराम शिंपी, (क) चंद्रभान शेट, (ड) शामराव.

(२) बाबा आपली आंतडी धुवून ......... झाडावर वाळत टाकीत असत.

(अ) पिंपळ, (ब) लिंबाच्या, (क) जांबाच्या, (ड) वडाच्या.

(३) मशिदीत वाघाने प्राण सोडल्यापासून .......... दिवसांनी बाबांनी देह ठेवला.

(अ) १०, (ब) ७, (क) १२, (ड) ९.

(४) बाबांनी देह ठेवण्याच्या अगोदर लक्ष्मीबाईला ........ रु. दक्षिणा दिली.

(अ) ७, (ब) ९, (क) ११ (ड) ५.

(५) बाबांनी बाळाराम मानकरांना .......... गडावर पाठविले.

(अ) सज्जनगड, (ब) मच्छिंद्रगड, (क) लोहगड, (ड) सिंहगड.

(६) बाबा ........ दिवसाआड चावडीत झोपत.

(अ) एक, (ब) दोन, (क) चार, (ड) तीन.

(७) लोहाराची मुलगी भट्टीत पडत असताना बाबांनी तिला वाचविले तो दिवस ........... चा होता.

(अ) गोकुळ अष्टमी, (ब) धनत्रयोदशी, (क) मकर संक्रांत, (ड) सर्वपित्री अमावास्या.

(८) मेघाने बाबांना ........ दिवशी बाबांना सचैल स्नान घातले.

(अ) रामनवमी, (ब) गुरुपौर्णिमा, (क) संक्रांत, (ड) वर्षप्रतिपदा.

(९) बाबांचे दर्शन होईपर्यंत साखरेचा चहा पिणार नाही अशी शपथ ........... नी घेतली होती.

(अ) नानासाहेब चांदोरकर, (ब) चोळकर, (क) रावबहादूर साठे, (ड) गोपाळराव बुटी.

(१०) बाबा राहत्याला ......... यांजकडे जात.

(अ) श्री. डेंगळे, (ब) श्री. रासने, (क) श्री. नूलकर, (ड) श्री. निमोणकर

प्रेषक माधव गोरे, विनायक वागा बालाजीमंदिर जवळ कुर्ला

**उत्तरे (१)–अ, (२)–क (३)–ब, (४)–ब, (५)–ब, (६)–अ, (७)–ब, (८)–क, (९)–ब, (१०)–अ**

# माझी श्रद्धास्थाने

ले.– डॉ. के. भ. गव्हाणकर, कुर्ला.

श्रीसद्गुरु साईबाबांनी माझ्याकडे दोन पैसे मागितले. त्याचा अर्थ त्या वेळेस समजला नाही. पुढे कालांतरांनी तो समजला. त्याचा अर्थ, 'श्रद्धा व सबुरी.'

मानव म्हणजेच मनन करणारा, इंग्रजी शब्द मॅन (Man) हाहि संस्कृत मन - विचार करणे या धातुपासून आला आहे. तात्पर्य तुमचे मानव नाव, तुमची आजवर झालेली उत्क्रांति, गुण-विकास प्राण्यांच्या श्रेणीत तुमची पायरी, या सर्वांवरुन तुम्ही विचारवान ठरता. तुम्ही विचार केलाच पाहिजे. जे विचार करतात, विवेक करतात, मनन करतात, त्यांना ज्ञान अत्यावश्यक आहे. कारण ज्ञानाने सामुग्री पुरविल्याविना तुलना, तर्क, अनुमान कोणत्या आधारावर करावे? आणि मत कसे द्यावे, यास्तव ज्ञानी मनुष्यावर श्रद्धा ठेवणे किती अवश्य आहे!

श्रद्धा म्हणजे विश्वास – आत्मविश्वास. ती कोणावर बसते? तर प्रेमावर, अर्थात प्रेम म्हणजे काय, त्याचे स्वरूप काय व त्याची क्रिया काय याचा स्पष्ट बोध झाला नाही तर आपण बाह्य क्रियेलाच प्रेम समजू व ते प्रेम केव्हातरी गोता देईल व 'अश्रद्धा' निर्माण होईल आणि मग जीवनसौख्याला जीव मुकेल, वास्तविक 'प्रेम नये बोलतां, प्रेम नये दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे । असे त्याचे रूप आहे.

आपणास कोणावर प्रेम करता येणार नाही. आपले आपल्यावर जे सहज नकळत, केल्याशिवाय प्रेम सारखे वहात आहे, तसे आपणांस दुसऱ्यावर करता येईल काय? आपण आपल्यावर प्रेम करतो का ते होत आहे? तुम्ही देव माना अगर मानू नका, परंतु जीवावर जे सत्तेने सतत प्रेम वहात आहे त्याला मी देव समजतो, त्याला मी श्रीसाईबाबा मानतो. त्यालाच मी प्रेमस्फुरण विठ्ठल म्हणतो. बाळाला आईचे आंगभर प्रेम आहे पण बाळाला काय उपयोग! ते ज्यावेळी एके ठिकाणी दुधाच्या रूपाने स्तनात जमते तेव्हा मातृत्व उमगते मातृप्रेम जागृत होऊन बाळाची श्रद्धा मातेवर बसते. तसेच 'देव' जळी स्थळी आहे. पण कुठे तरी तो मानावा - श्रद्धा ठेवावी लागते.

जग पहा बरे, स्वतःवर प्रेम नाही – श्रद्धा – विश्वास नाही असा कोण आहे. धर्म, कर्मव्यवहार, समाजधारणा, राजकारण, काहीही क्रिया असो, मनुष्य स्वप्रेमाच्या खुणेच्या लक्षांशाने करतो. आपले प्रेम ज्यात गमावेल असली क्रिया चुकूनही जीवाकडून घडत नाही. फार काय रडतो तो सुद्धा प्रेमाकरताच त्या रडण्यात सुख वाटत नसेल, प्रेम भोगता येत नसेल तर मनुष्य रडणार नाही. मुलावर, पतीवर, पत्नीवर, आईबापावर स्वप्रेमाकरिता प्रेम कर्मक्रिया-रूपाने स्वप्रेम प्रतिबिंब भोगीत आहे. स्वतःवरील प्रेमाचा ओघ कोणत्याही क्षणी थांबलेला नाही; आणि तो आपल्या कर्तृत्वज्ञातृत्वावाचून. या ओघावर आपली नजर गेली तर प्रत्येकाच्या जिवीताचा ओघ असाच वहात आहे, हे सहज ध्यानी येईल. कर्मक्रिया भिन्न दिसल्या तरी वहाणी एक आहे त्याची रुची ही एकच आहे. या प्रिय वहाणीला प्रत्येक जीव प्रिय आहे. चोर, जार, सुष्ट दुष्ट, साधु साधक कोणीही असो ही वहाणी थांबलेली नाही, यावरून ध्यानात येईल की जगात कोणी सुष्ट नाही दुष्ट नाही, सुखी नाही, दुःखी नाही. प्रेम प्रिय ओघाचा जीवरूपी एक बुडबुडा, दिसतो इतकेच, तो दिसतोसुद्धा भासण्याकरिता एरव्ही पाण्याचाच बुडबुडा, बुडबुडाच पाणी नाही का ?

आई मुलाला दुध पाजील पण पचविण्याची क्रिया करता येईल काय? स्तनात दूध आले पर पाजील दूध तिला निर्माण करता येणार नाही. दुध निर्माण करणे, पचविणे हे जीवात सतत सत्तेने वहात असलेल्या प्रेमाचे दर्शन आहे. जीवावर ती अखंड प्रेमाची गळती लागली आहे, त्याच्या पराधीशानेही ती आपल्या जीवनात आपल्यास प्रकट करता यावयाची नाही. या सप्रेम दिपत्वाचा ओघ जीवाला किती सुखावित असतो, जपत असतो, हे जंव जंव ध्यानात येते तंव तंव जीव प्रेम सत्तेला अनन्य होतो–श्रद्धा ठेवतो, परंतु या स्वप्रेमसत्तेवर नजर नेण्याचे काम फक्त संत, सत्पुरूष व अवतारी पुरुष करतात इतर या प्रेमापासून जीवाला विमुख करू पहातात.

माझे श्रद्धास्थान श्रीसाईबाबा पहिल्या भेटीतच त्यांनी जीविचाच जीवि जोडून दिला. स्वानुभवाने सतत वहाणाऱ्या प्रेमसत्तेवर आपल्या तेजाने जीवाची (माझी) नजर नेली ती तेथेच स्थिरावली नव्हे माझा जीव पांगळला,
'येणे वचन तेजाकारे । फिटले आंतील बाहेरील अंधारे ।।'

ज्या प्रेमाला खंड आहे, जे पुरेसे वाटते काही काळ तरी वीट येतो त्याला प्रेम म्हणता येईल काय? आणि मग त्यावर श्रद्धा बसेल काय? स्वप्रेम केव्हा विटते, केव्हा थांबते, केव्हा पुरेसे वाटते ते प्रेम अखंड राहो, अवीट आहे, झरणीरूप आहे, विरही आहे, हा स्वप्रेम सत्तारूप प्रिय पद्मनाभ श्रीसाई संतानी माझ्या गुरुंनी भेटविला अदृश्य दर्शने संताचेनि दृश्य वस्तु सहज दिसतात,

सूक्ष्म पल्लेदार दुर्बिणीने दिसतील, पण अतिन्द्रिय वस्तू इंद्रियात माझ्या गुरुने ब्रम्हचारी श्री गणेशभक्त देवी डॉक्टर त्र्यं. वि. सामंत उर्फ भाऊ महाराज (कुर्ला) यांनी दाखविल्या त्यांच्या कृपेने माझी दृष्टी खोलली गेली व श्रीसाईबाबा ही काय चीज आहे, नव्हे ज्याच्या कृपेने मला माझ्या साई माऊलीची ओळख झाली. ते गुरुचे स्थान-श्रद्धा स्थान होय. गुरु व सद्‌गुरु एकच ब्रम्ह आहे याचा बोध ज्याच्यामुळे झाला तो 'आत्मा' – स्वतःच्या ठिकाणी रमणे – आत्मानंद हे एक श्रद्धास्थान आहे, सृष्टीतील यच्चयावत् सर्व जीव जंतू ज्यामुळे घडी घडी श्रीसग्दुरु साईबाबांची आठवण होते तेही श्रद्धास्थान आहे. अर्थात १ ली शिरडी, २ री मशीदमाई–द्वारकामाई ज्या जागेत श्रीसाईबाबांना दर्शन व प्रत्यक्षांत भेट व बोलाचाली ३ रे गुरु त्र्यं. वि. सामंत ज्याने सग्दुरु महिमा दाखवून मला डोळस केले, ४ थे सृष्टी, जग, यामुळे घडी घडी बाबांची लीला अनुभवता येते. ५ वे शिरडी साईबाबा व ६ वे हृदयस्थ साई. एकापेक्षा एक गोड व आनंददायक श्रद्धास्थाने आहेत.

'एकं सत विप्रा बहुधा वदंति' म्हणजे सत्य एक आहे, त्याला सुज्ञ लोक बहुत नावे देतात. हे मूळ चैतन्य (श्रीसाई) ब्रम्हांडात द्रव्याच्या अंतर्यामी रहाते आणि द्रव्यापासून पुढे सारे पदार्थ व आकार तयार होतात. ही मूलभूत कल्पना आपणच आकलन करुन ध्यानात धरली पाहिजे. विधाता सृष्टी कशी घडवतो त्याची प्रक्रिया ह्या मूलभूत कल्पनेपासून विशद होईल.

चैतन्याची, जीवाची उत्क्रांती किंवा विकास होण्याला उत्तरोत्तर अधिकाधिक सुसंस्कृत देह पाहिजेत तरच त्या देहातून जीवाचे श्रेष्ठ, श्रेष्ठतर गुण प्रकट होऊ शकतील. देहाची उत्तरोत्तर संस्कृत होत जाणारी परंपरा उत्क्रांतिवाद्यांनी आधीच मान्य केली आहे. त्या देह परंपरेच्या जोडीला, तिच्या पूर्ततेसाठी सार्थकतेसाठी विकासी जीवाची अर्थात चैतन्याची परंपरा ब्रम्हविद्या मांडते. अशा रीतीने देह व मन यांची जोडीने उत्क्रांति अनेक जन्म होत होत मोक्ष सोपान चढतो. त्यासाठी श्रद्धा मग ती डोळस अगर अंध असो. व सबुरी अवश्य आहे.

अंधश्रद्धा म्हणजे बावळटपणा नव्हे, ती शुद्ध, निर्मळ, निरिच्छ, निष्काम असते. उदा – समर्थ रामदासाचा 'भोळा' ज्यानी आपल्या अंधश्रद्धेने श्रीराम पंचायनातील, सीतेला, लक्ष्मणाला व मारुतीरायाला कामाला लावले. 'भोळा भाव सिद्धीस जाव."

मनुष्य भवितव्यतेच्या हातचे केवळ बाहुले, त्याला स्वतःची काडीभर सत्ता व शक्ती नाही. मूल जन्मते तेव्हा त्याचे मन कोऱ्याकागदासारखे नसते. बाल-

स्वभावाची माहिती असलेला माणूस असेच सांगेल की प्रत्येक मुलाचे शील व मन हे अगोदर बनलेले असते. काही गुणदोष मनाची चलाखी मंदी ही मूळचीच असतात. ती जमेस धरूनच त्याला शिक्षण द्यावे लागते. मुसलमान बंधूचे मत असे की, मूल जन्मते तेव्हाच त्याच्या गळ्यात त्याचे नशीब (किस्मत) बांधलेले असते, आणि ते बहुतांशी सत्य आहे.

आयते कपडे जसे आपल्या अंगाला (फीट) येत नाहीत तशी दुसऱ्यांची आयती उत्तरे कायमची आपल्या मनास येत नाहीत तुमचा तुम्ही विचार केला पाहिजे. नाहीतर जन्मभर वेडे अज्ञानी राहिले पाहिजे.

निसर्गाचा नियम मनुष्याची आवडी निवडी पहात नाही पण नियम जाणून घेऊन व पूर्ण श्रध्दा ठेवून त्याच्या सहकार्याने मनुष्याला आपली उन्नत्ति त्वरीत करता येते, स्वतःचीच नव्हे तर दुसऱ्यांचीही करता येते, तसे केले म्हणजे सर्व मिळून देवपदाचा सोपान आपण सत्वर चढू शकू.

एकदा मशीदमाईत कै. अण्णासाहेब दाभोलकर यांना बाबांनी विचारले, "अरे अण्णा! वाकडतोंड्या भेटला काय? दाभोलकर "होय" (वाकडतोंड्या म्हणजे गणपती) तेव्हा माधवराव देशपांडे (शामा) यानी विचारले "देवा! या कलीयुगात देव भेटतो कारे"! बाबा "हो भेटतो, आकड्याच्या मूळाखाली श्रद्धेने व भक्तिभावाने त्याचे पूजन करावे म्हणजे २१ वर्षांनी भेटतो" त्या-वेळेस मी हजर होतो. हे ऐकल्यानंतर बाबांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळे आंक-ड्याचा वृक्ष (मंदार वृक्ष) मी गोरगावहून आणला व त्याची पूजा वगैरे केली त्याच वृक्षाखाली सिद्ध गणपती आला. तो हल्ली माझ्या पूजेत आहे हे श्रद्धेचे फळ.

बाबांनी मागितलेले 'दोन पैसे' श्रद्धा व सबुरी मला उपयोगी पडते. असो शेवटी लक्षात धरा, शीलस्वभाव बनविण्यास जसा विचार मुख्य आहे. तसा सुखदुःख पावण्यात शील स्वभाव मुख्य आहे. ज्याचा शीलस्वभाव उदार दृढनिश्चियी परिपक्व बनला त्याचा भविष्यकाळ निःसंशय उज्ज्वल होणार. ती सत्ता तुमच्या हाती आहे. चांगल्या वाईटाची निवड करून घेणारे तुमचे तुम्ही आहा.

प्रत्येक जीवाचे श्रद्धास्थान निरनिराळे असेल पण श्रद्धेशिवाय या जगात अनंतात-आनंद भोगता येत नाही हेच खरे.

● ●

# मी वीरपूरहून आलो--पहा माझे पाय !

अनुवादक : **श्री. चन्द्रकांत दामोदर सामंत**

परमेश्वरी लीला अगाध आहे. तिचा अंत आतापर्यंत कोणालाही लागलेला नाही. शिरडीत देहधारी असताना तसेच समाधिस्थ झाल्यानंतरही श्री बाबांच्या लीला आपल्या नित्य प्रत्ययास येत आहेत. असाध्य रोगातून मुक्ति, परिक्षेत अकल्पित यश, अपघातातून बचाव, नोकरीचाकरीची सुलभता अशा अनेक प्रकारच्या श्रीसाईकृपेच्या गोष्टी आपल्या नेहेमीच्या पाहण्यातील आहेत, तथापी सुरतच्या श्रीसाईबाबा सत्संग मंडळाच्या भजन करणाऱ्या मंडळींना त्यानी जो कृपाप्रसाद दिला, त्याची गोडी काय वर्णावी!

सुरतेत श्रीसाईमंदीर स्थापन होण्यापूर्वीची म्हणजे १९५८-५९ साली घडलेली ही घटना आहे. सत्संग मंडळाच्या सध्याच्या चालकांपैकी बरेचजण त्यावेळी भजन मंडळाचे सदस्य होते. सर्वानुमते त्यावर्षी शिरडी येथे श्रीबाबांच्या दर्शनाला जाण्याचा बेत ठरला. सर्वश्री ठाकोरभाई पानवाला, मगनभाई पानवाला, लालभाई, राणाजी, छबिलदास मिठाईवाला, सी. सी. ठाकोर, वगैरे मंडळी मुंबईहून पुणे मार्गे मनमाड व तेथून शिरडी मुक्कामी पोहोचली. तेथे गुरुस्थानाच्या समोर ही मंडळी उतरली व त्याठिकाणी तीन चार दिवस त्यांचे वास्तव्य होते.

एके दिवशी श्री. ठाकोरभाई पानवाला हे संस्थानच्या कचेरीत गेले व तेथे आपली ओळख देऊन त्यांनी श्रीबाबांच्या दरबारात भजनाचा कार्यक्रम करण्याची परवानगी मागितली. तसेच मंडळाकडे पेटी वाजवणारा नसल्यामुळे संस्थानने त्याची सोय करावी अशी विनंति केली. संस्थानने तीही मागणी मान्य केली.

त्या रात्री नऊ वाजता मंडळातर्फे भजनाचा कार्यक्रम होणार असे जाहीर झाल्यामुळे समाधिमंदिरात भक्तांची उपस्थिती बऱ्यापैकी होती. भजनमंडळी आपापल्या जागी बसली व पेटी वाजवणाऱ्याची वाट पाहू लागली. इतक्यात सुमारे पन्नाशीच्या आसपासचा एक दाढीवाला मनुष्य तेथे आला व त्याने पेटी आपल्यासमोर ओढून सूर जुळवावयास आरंभ केला. थोड्याच वेळात भजनाला सुरुवात झाली. मंडळाच्या साथीला बसण्याचा ह्या पेटीवाल्याचा हा पहिलाच प्रसंग होता, तरी त्यांच्याशी वर्षानुवर्षे परिचय असल्यासारखा तो त्या कार्यक्रमात एकरूप झालेला दिसत होता. श्रोतेजन भक्तिरसात आकंठ बुडाले होते. काही वेळाने भजनाचा कार्यक्रम समाप्त झाला. भजनमंडळाच्या

सदस्यांच्या लक्षात यावयाच्या अगोदरच तो म्हातारा पेटीवाला निघून गेला. संस्थानच्या रिवाजाप्रमाणे इतर कलावंतांप्रमाणे पेटीवाल्यास देण्यासाठी श्रीफळ व रुपया मंडळाच्या स्वाधीन करण्यात आला, तेव्हा त्याची अनुपस्थिती सर्वांच्या ध्यानात आली. श्री. ठाकोरभाईंनी पेटीवाल्यातर्फे प्रसादाचा स्वीकार करून सर्वांसमवेत त्याचा खूप शोध केला पण त्याचा पत्ता लागला नाही.

दुसरा दिवस उजाडला. मंडळाचे सर्व सदस्य चहा पिण्यासाठी निघाले. त्यावेळेस सध्याप्रमाणे हॉटेलांचा सुकाळ नव्हता. सर्वजण चहावाल्याच्या गाडी-जवळ आले. पाहतात तो काय आदल्या दिवशी भजनाला साथ करणारा पेटीवालाच तेथे बसला होता. श्री. ठाकोरभाई त्याच्या बाजूला बसले व उरलेले सर्व अवतीभवती बसले. फार सुंदर रितीने पेटी वाजविल्याबद्दल सर्वांनी त्याचे आभार मानले, व त्याला चहा पाजला. बोलता बोलता त्या म्हाताऱ्याने स्वतःचा एक पाय वर उचलून त्यांना आपल्या पायाचा तळवा दाखविला व म्हटले, "पाहिलेत! तुमच्यासाठी मला फार दुरून धावत पळत यावे लागले. मी वीरपूर येथे होतो. तेथून अहमदाबाद मार्गे मी येथे धावत आलो." कडक उन्हाळ्याचे दिवस व दगडावरून धावपळ केली असल्यामुळे पाय कापल्याच्या स्पष्ट खुणा दिसत होत्या. परत एकदा सर्वांनी त्याचे मनः-पूर्वक आभार मानले व त्याला भोजनाचे आमंत्रण दिले. तो पेटीवाला थोडा दूर गेल्यानंतर अचानकपणे दीर्घ निद्रेतून जाग यावी तसे सर्वजण भानावर आले. एव्हाना सर्वांचीच खात्री झाली होती की तो पेटी वाजविणारा इसम दुसरा तिसरा कोणी नसून ते खुद्द श्रीबाबाच होते. एरवी अपरिचित अशा भजन मंडळींशी एवढ्या तन्मयतेने एकरूप होऊन पेटी वाजवणे दुसऱ्या कोणाला सहज शक्य झाले नसते. भोजनाच्यावेळी सर्वांनी पेटीवाल्याची खूप वाट पाहिली, पण व्यर्थ!

भक्तांविषयी व त्यांच्या कार्याविषयी एवढी आस्था बाळगणारे श्री साईनाथ हे खरोखरच युगावतार नव्हेत काय?

● ●

# अजानबाहू श्री साई

**डॉ. अनिल, नागपूर**

१९७१ च्या मे महिन्यात मी पहिल्यांदा शिर्डीस बाबांचे दर्शनास आलो. बाबांवर माझी आपोआपच श्रद्धा बसली. त्याचा परिणाम म्हणजे मी दर्शन घेऊन परत गेल्यावर दर गुरुवारी आंघोळ केल्यावर सकाळीच बाबांचे स्तोत्र वाचू लागलो, व त्या दिवशी उपवास ही करू लागलो. सुमारे सहा महिने लोटल्यावर एका गुरुवारी पहाटे मला खालील स्वप्न पडले-

स्वप्नदृष्टांत – माझ्या बरोबर माझी काही मित्रमंडळी फिरत असता भिकाऱ्याचे वेषात बाबा प्रत्येकाजवळ भिक्षा मागू लागले. तेवढ्यात मी त्यांना सहज दिसलो. त्यांनी मला पाहिल्यावर मी त्यांना पुरेपूर ओळखले हे जाणून त्यांनी माझेकडे पाहून मंदस्मित केले व माझ्याकडे भिक्षा मागितली. मी तावडतोब माझ्या विजारीच्या खिशात हात घातला तर दोनच रुपये निघाले. खिशात आणखी पैसे नव्हते. तेव्हा तेवढेच पैसे मी त्यांना दिले व नमस्कार केला. त्यानंतर त्यांनी अल्ला तेरा भला करेगा असे म्हणून माझ्या पाठीवर थाप मारली इतके होते न होते तोच उजाडले. मी उठल्यावर आंघोळ वगैरे केली. आणि सहज गॅलरीत येऊन माझ्या मित्राबरोबर बोलत उभा राहिलो. मला स्वप्नाची वगैरे काहीच आठवण त्यावेळेस नव्हती. थोड्याच वेळात एक साधु, अगदी बाबांसारखाच दिसणारा पण त्याचे गळ्यात सर्प होता, इतर घराकडे न जाता आमच्याच दारात येऊन उभा राहिला, आणि त्याने भिक्षा मागितली त्याचे एकंदर स्वरूप पाहिल्यावर मला स्वप्नाची आठवण चटकन झाली आणि त्यास पैसे देण्याकरिता म्हणून मी माझ्या विजारीच्या खिशात हात घातला. आश्चर्य असे की त्यावेळीसुद्धा माझ्या खिशात दोनच रुपये निघाले आणि ते चटकन मी त्या साधुला दिले. त्याबरोबर अल्ला तेरा भला करेगा असे शब्द त्याने उच्चारले आणि कोठे न थांबता जसा आला तसा तो सरळ परत गेला. मग मी घरात येऊन सर्व हकिगत माझ्या आईला सांगितली. नंतर सर्वजण बाहेर येऊन पाहतात, तो साधु आहे कोठे ? पुष्कळ तपास केला पण तो सापडला नाही. माझी आई नंतर म्हणाली की, तुला साक्षात बाबा येऊन भेटले पण तू असा वेडा की त्यांना घरातही बोलावले नाहीस, मला पडलेले स्वप्न आणि त्याची तावडतोब आलेली प्रचिती याने इतका भांबावून गेलो की त्या साधुला घरात बोलवावयाचे मला भानच राहिले नाही.

बाबा पुन्हा केव्हातरी असेच मला प्रत्यक्ष भेटतील याची मला खात्री आहे अनवधानाने त्यांचा अनादर झाल्याबद्दल मी त्यांची मनोमनी क्षमा मागितली

राजा दशरथांनी श्री विश्वामित्रांच्या यज्ञरक्षणार्थ जाण्यास श्रीराम-लक्ष्मणास आज्ञा दिली. श्रीराम-लक्ष्मण या दोघा बंधूनी वडीलांची आज्ञा शिरसावंद्य केली. ते दोघे जाण्यास प्रवृत्त झाले.

माता कौसल्येच्या आज्ञा-आशिर्वादास्तव गेले असताना तिनेही वडीलांची आज्ञा पालन करण्यास सांगितले. राम-लक्ष्मणांच्या विवाहयोगासंबंधी पूर्व सूचना श्री नारदमुनिंनी माता कौसल्येस दिलेली होती.

श्रीराम-कृष्णास लोणी-साखरेशी अती प्रेम आहे. श्रीसाईस देखील पहाटे लोणी-साखरेचाच नैवेद्य अर्पिला जातो. साखरेद्वारे लोण्यात गोडी येते. सद्-गुणाद्वारे जीवनात माधुर्य येते.

सर्वांस मान दिल्यास आपले जीवनसुद्धा साखरेप्रमाणे गोड व मधूर होत असते.

सर्वांस मानाचे दान देणे श्रेष्ठ आहे. आपल्या श्रीसाईमाऊलीने सुद्धा जव्हार अल्ली उर्फ वडे बाबास मानदान दिल्याचे वाचकांना आठवतच असेल. (अध्याय ५—श्री साईचरित्र)

श्री साईसमर्थांच्या या लीलेपासून आपणास हीच शिकवण मिळते.

थोरामोठ्या सर्वांस मान द्या. गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी या सर्वांविषयी समदृष्टी बाळगा. सर्वांशी प्रेम करा. सर्वांशी प्रेमाने व आदरयुक्त अंतःकरणाने वागा. मग पहा स्वतःच्या जीवनाची गोडी व माधुर्य. काय परम-सुख मिळते ते तर.

याची लज्जतच काही न्यारी आहे. ज्याच्या जीवनात माधुर्य नाही तो ईश्वरास कधीही आवडत नाही.

विद्यादान, ज्ञानदान व द्रव्यज्ञानापेक्षाही मानदान सर्वश्रेष्ठ आहे. मानदान हे श्रेष्ठदान आहे. कधीही कोणाचा अपमान करु नका. कधी कोणी आपला अपमान केलाच तर तो मुकाट्याने सहन करा.

सहनशक्ती सारखी श्रेष्ठ शक्ती नाही. घरी कदाचित खाण्यास दाणा नसेल परंतू सहनशक्ती असल्यास तीच व्यक्ती आपणास प्रफुल्लीत व आनंदीत दिसतो. श्रीमंत असून ज्यात सहनशक्ती नाही तो सदासर्वदा खिन्न निराश व बेचैनच दिसेल.

सहनशक्ती साठवा.

व मानदान करा. सर्वांस मान द्या. मग पहा जीवनात काय गोडी येते. कदाचित साखरेसही यापुढे नमावेच लागणार.

माता कौसल्या श्री विश्वमित्रास म्हणते :—
"मुनिश्रेष्ठ! माझ्या रामास लोणी-
साखर नित्य नेमाने देत राहा.
नाहीतर माझा राम दुर्बल होईल."

वाचकांनो!
रामच दुर्बल झाला
तर जीवनातील आराम नाहीसे
होईल एकंदरीत जीवनच शुष्क होईल.

"आराम हराम है" ही गोष्ट सर्वतोपरी मान्य आहे. मर्यादेबाहेरील आरा-मास हा नियम लागू पडतो. परंतु जिथे 'आरामच' नाही तिथे काय बरं 'हराम' होणार आहे? जीवनात आराम हवा असेल तर श्रीरामाचे चिंतन करा. श्रीसाईंचे वा कोणत्याही ईश्वराचे चिंतन करा. ईश्वरास दौर्बल्य येऊ नये या भावनेनेच त्यास सकाळी लोणी-साखरेचा नैवेद्य अर्पित करा.

कोणी विचारतो :— "काय हो! हे
काय सांगता? सर्व शक्तीमान
प्रभू कधी दुर्बल तरी होतो
काय? तो काय तुमच्या
लोणी-साखरेचा भुकेला होय?"

नाही. मुळीच नाही. देव आपल्या लोणीसाखरेचा भुकेला मुळीच नाही. ज्याने अर्पिले त्याचेही भले व ज्याने नाही अर्पिले त्याचेही भले. हा तर केवळ भावाचा प्रश्न आहे. आपणास देखील श्रीसाईबाबांचे खालील शब्द आठवत असतील.

"जो जो मज भजे जैसा जैसा भावे ।
तैसा तैसा पावे मी ही त्यासी ।।"

अर्थात् —

जैसा भाव
तैसा देव

ईश्वरास जर आपण लोणी-साखरेची गोडी निर्मळ प्रेमयुक्त अंतःकरणाने चाखावयास दिली तर त्यासमुद्धा परत-फेड म्हणून आपणास जीवनातले माधुर्य चाखावयास द्यावेच लागणार.

कोणी म्हणे :— "यात स्वार्थ दडपलेला आहे."

मला त्यांना प्रत्युत्तरादाखल हेच सांगावयाचे आहे की आपण काही "वैरागी" वगैरे नसून केवळ भक्तीमार्गाचे अवलंबन करणारे 'गृहस्थाश्रमी' आहोत व कोणत्याही ईश्वरासमोरील प्रत्येक वंदनेत आपला काही न काही 'स्वार्थ' दडपलेला असतो. काही नाही तरी आपण "कृपादृष्टी असू द्या." असे तरी म्हणतोच असो.

ज्यावेळेस श्रीराम-लक्ष्मण श्रीविश्वामित्री बरोबर निघाले त्यावेळी ते किती शोभायमान दिसायचे :—

अरुन नयन उर बाहु बिसाला ।
नील जलज तनु श्याम तमाला ॥
कटि पट कसे वर भाता ।
रूचिर चाप सायक दुहुं हाथा ॥

विश्वामित्र म्हणजे साऱ्या विश्वाचे मित्र. अखिल ब्रम्हांडाचे मित्र ते विश्वामित्र.

"विश्वस्य मित्र सः
विश्वामित्र ।"

या जगताचा मित्र आहे. जीव. मनुष्य अर्थात जीव जेव्हा सर्वांचा मित्र बनतो तेव्हा शब्द 'ब्रम्ह' त्याच्या मागे मागे येत असतो.

आणि त्यानंतर 'परब्रम्ह' देखिल येतो.

आपण जगत मित्र झाल्यावर साक्षात ईश्वरासही आपल्या मागे धावे लागणार. श्रीराम-लक्ष्मणासही आपल्या मागे धावे लागणार. श्रीराम—हेच परब्रम्ह आहेत. शब्द 'ब्रम्ह' आहे. शब्दब्रम्हाशिवाय परब्रम्ह प्रगट होऊ शकत नाही.

श्री विश्वामित्रामागे राम-लक्ष्मण चालले. मार्गात ताडकेचा उद्धार केला. श्री विश्वामित्रांनी या दोघास 'बला व अतिबला' या विद्या प्रदान केल्या होत्या. त्यामुळे त्यांना भूक-तहान जाणवत नसे. पुढे हे तिघेही आश्रमात येऊन पोहोचले

श्रीराम म्हणाले :—"गुरुश्रेष्ठ । आपण यज्ञास आरंभ करावा. मी त्याचे संरक्षण करीन."

जनकपुरी जवळ ऋषि विश्वामित्राचे सिद्धाश्रम आहे. ते तिथे यज्ञ-तप करायचे.

विशाल यज्ञ-मंडप उभारण्यात आला.

धनुष्य-बाणाने सुसज्ज असलेले श्रीराम-लक्ष्मण यज्ञाच्या रक्षणार्थ उभे आहेत.

द्वारिकामें द्वारिकानाथ खडे है ।
डाकोर में रणछोडरायजी खडे है ।
श्रीनाथजी में गोवर्धननाथ खडे है ।
पंढरपूर मे विठ्ठलनाथजी खडे है ।
–(स्कंद ९–श्रीमत् भागवत रहस्य)

परमेश्वर म्हणतो :– "जेव्हा जीव माझ्या दर्शनार्थ
येतो तेव्हा मी त्यास उभे राहून दर्शन देतो.
मी जीवाशी भेटण्यास आतुर आहे.
तो मला प्रेमाशी भेटण्यास येतो तेव्हा मी
सुद्धा त्यास भेटण्यास उत्सुक असतो. माझ्या
भक्तांच्या प्रतिक्षेतच मी अनंतकालापासून उभा
आहे. मी उभ्यानेच भक्ताची प्रतिक्षा करीत आहे.

तरीपण कोणताही भक्त मला बसावयास
कधीच विनवत नाही.
सर्व भक्त आपल्या स्वार्थ-पूर्तीसाठीच
येत असतात.
माझ्याशी विभक्त झालेला जीव माझ्या
दर्शनास केव्हा येईल व केव्हा मला
बसावयास विनवेल याची मी
सारखी वाट पाहत उभा आहे.

ईश्वराची दृष्टी तर जीवाकडे अखंड रूपाने आकृष्ट आहे. नित्यनियमित तो येणाऱ्या भक्तांकडे समदृष्टीने पाहात असतो. परंतु या मोहमायेत गुरफटलेला जीव ईश्वराकडे निर्मळ-शांत-स्थिर मनाने पाहतच नाही.

अनेकदा भक्तसमुदायातर्फे अनंत कालापासून चरण-वंदना करण्यास येते. परंतु उभ्या असणाऱ्या ईश्वराचे –

'पाय दुखत नसतील काय?'–

याकडे सर्वच दुर्लक्ष करतात. जोपर्यंत समोर असणाऱ्या दगडाच्या मूर्तिस दर्शनास्तव येणारा भक्त निर्जिव व जडच समजतो त्यास देव तरी काय देणार?

श्री.द्वारिकानाथ, रणछोडरायजी, गोवर्धननाथ, व पंढरपूरचे 'विठ्ठलनाथ यांचे पाय चेपण्याची वा पादसेवा करण्याची सवड कोणासच नाहीं.

श्री साईसच्चरितात श्री साईबाबांनी म्हटलेले आहे :–

"हो हो प्रकटेल विट्ठलमूर्ती ।
भक्त भावार्थी पाहिजे ॥८४॥
डाकुरनाथाची डंकपुरी ।
अथवा विठ्ठल रायाची पंढरी ।
ती हीच रणछोड द्वारकानगरी ।
जाणे न दूरी पहावया ॥८५॥
विठ्ठल भक्तप्रेमें उत्कटून ।
एथेंही प्रकटून राहील ॥८६॥"

–(अध्याय ४– श्रीसाईचरित्र)

म्हणूनच की काय श्री साईसमर्थांच्या समकालीन भक्तांना ही जाणीव झाली असावी, व त्यांनी श्रीबाबांना उच्चासनावर बसवून षोडषोपचार पूजा-विधि करण्यास आरंभिले

हा सर्व बाह्य दिखावा श्री साईबाबास मुळीच आवडत नसूनही – 'कोणाचे मन दुखवू नये'–या प्रणालीनुसारच यात त्यांनी मुळीच आक्षेप घेतला नाही. परिणामस्वरूप आजतागायत श्री साईबाबा शिर्डी क्षेत्रातील समाधि मंदिरात सिंहासनावर आरूढ असलेले आपण पाहात आहोत.

श्री रामचंद्र प्रभूंनी शिलारूप अहिल्येचा
उद्धार केला.
श्री साईनाथ प्रभूंनी शिलारूप वृद्धीचा
उद्धार केला.

द्वारकामाईच्या पटांगणात अद्याप ही शिला जपून ठेवलेली आपणा सर्वांच्या दृष्टीस पडते.

श्री रामचंद्र प्रभू अजानबाहू आहेत.

त्याचप्रमाणे श्रीसाई समर्थ अजानबाहु आहेत.

गुडघ्याच्या खालपर्यंत लांब असणाऱ्या हातास 'अजानु बाहु' म्हणून संबोधितात. श्रीसाई प्रभूंचेही हात फारच लांब व गुडघ्याच्या खालपर्यंत पोहचत होते. अर्थात श्रीसाईबाबा अजानबाहु होते ही गोष्ट निर्विवाद आहे.

'अनेक भक्त दूरदूरून मला
भेटावयास येतात. त्यात
गरीब-अमीर-राव-फकीर या
या सर्वांचा भरणा असतो. लठ्ठ
भक्तांशी देखील आलींगन बद्ध
होता यावे म्हणूनच मी आपले

हात लांब ठेवलेले आहेत.'

–हिच 'अजानुबाहु' विषयी श्री साईसमर्थांची भूमिका असावी असे या ओळींच्या लेखकास तरी वाटते.

शेवटी,

'साईच लिहिता लिहविता आपण ।
भक्त कल्याणा कारणे ।'

–(अध्याय ३ – श्री साईचरित्र)

या श्री साईसच्चरित्रातल्या पवित्र ओळींचे चिंतन करून आपल्या सर्व थोरा-मोठ्यांच्या चरण-वंदनेचे अक्षय पुण्य पदरी घेतो.

• •

---

## जुलै १९७६ खास गुरुपौर्णिमा अंकात –

१) गाठीभेटी या सदरात – अतींद्रिय योगीराज श्री. बापूसाहेब मिटकर
२) माझे बाबा – अहमदाबादच्या साईसेविका – ले. सौ. उषा कर्णिक
३) अगाधलीला – सौ. सरला गर्जे, पुणे.
४) अमोल भेट – सौ. उषा मुळे, शिर्डी
५) 'दत्तावधुता' – डॉ. अनिल जायस्वाल, नागपूर.
६) माझे बाबा श्रीसाई – श्री. के. रा. धालगांवकर, नागपूर.
७) तुमचे बाबांविषयी सामान्यज्ञान किती आहे?

याशिवाय

प्रा. गुंडेराव पटवारी, श्री. जयवंत कुलकर्णी, सौ. सुशिलाबाई हजारे, श्री. विजय हजारे, रमेश चव्हाण, विनायक पाठक, एन. आर. देशपांडे, 'चेतन', दशरथ तळेकर, सौ. श्री. शहाणे, पुष्पलता मोहरे, माधुरी कुलकर्णी, रामनाथ गुरुतुले इ. च्या भावमधुर कविता इ. इ. वाचनीय मजकूर.

# साईबाबा आणि माझी एम्. ए.

**कु. पुष्पलता मोहरे, एम्. ए.**
बडे पोष्ट ऑफिसके पास, राजेंद्र नगर, बिलासपूर, (म. प्र.)

१४ जुलै सन् १९७५ ला माझी एम. ए. अन्तिम राजनितीशास्त्राची लिखित परिक्षा संपली. पण अजुन १५ जुलैची मौखिक परीक्षा राहिली होती. वर्गात सर्वात जास्त संकोची व कमी बोलण्याचा स्वभाव असल्याने मला ह्या परीक्षेची जास्तच भीति वाटू लागली, कारण ह्या परीक्षेत प्रश्नांची उत्तरे येत जरी असली तरी अनोळखी परीक्षकांच्या समोर निर्भिड बोलण्याचे धाडस पण हवे, आणि त्यातल्या त्यात म्हणजे तेव्हाच आमच्या जुन्या लेक्चररचे ट्रान्सफर होऊन त्याजागी नवीन लेक्चरर आले होते. ४ दिवस मी खूप अभ्यास केला पण मनात मात्र खूपच घाबरत होते.

परीक्षेच्या दिवशी मी कॉलेजला जाण्यास निघाले. साईबाबा आमचे आराध्य दैवत असल्याने जाण्यापूर्वी मी साईबाबांना नमस्कार केला व उदीची पुडी पण बरोबर घेतली. ९ वाजता परीक्षा सुरू झाली. आपले नाव येईपर्यंत सर्व मुली बाहेर पुस्तके घेऊन अभ्यास करीत होत्या. पण मी थोडावेळ पुस्तक पाहायची तर थोडावेळ बाबांचा धावा. अखेर एक वाजता माझे नाव आले. मी आत जाण्याच्या पूर्वी मनोमन बाबांना नमस्कार केला व उदी लावली व परीक्षेच्या खोलीत गेले. पण आश्चर्य इतका वेळ वाटत असलेली भीति अचानक नाहीशी झाली व सर्व प्रश्नांची उत्तरे मी न भीता सहजपणे बरोबर दिली. त्यामुळे परीक्षक मला जास्तच आलटून पालटून प्रश्न विचारू लागले. त्यांनी ३५ मिनीटे परीक्षा घेतली बाहेर आल्यावर इंटरनलने येऊन सांगितले की सर्वात जास्त व सर्व ठीक उत्तरे तुम्हीच दिली त्यामुळे परीक्षक फार खुष झाले आहेत हे ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटले पण मी मनोमन बाबांचे आभार मानीत होते.

२ महिन्यानंतर वृत्तपत्रात निकाल छापला गेला व मी बाबांच्या कृपेनें द्वितीय श्रेणीमध्ये पास झाले. मौखिक परीक्षेत मला अपेक्षेपेक्षा जास्तच ६५ टक्के गुण मिळाले. खरोखर जर बाबांचे साहाय्य असले तर कशाची भीति! जेव्हा जेव्हा मला ह्या प्रसंगाची आठवण येते तेव्हा माझे मन साईबाबां-बद्दल कृतज्ञतेने भरून येते कृपाळू साईमाऊलीच्या चरणी माझे शत शत प्रणाम.

# तयांस पूर्ण अंतर्ज्ञान ........
# तयांस आधींच सर्वांची जाण ! !

**विखास शं. वैद्य**
१०७ दत्त निवास शिवाजी पार्क, रोड नं. ४ दादर, मुं. २८

बरीच वर्षं लोटलीत सदर घटनेला. परंतु ईश्वरीलीला कितीही पुरातन असल्या तरी त्या ऐकावयास आनंदच वाटतो– माझे वडील कै. शंकरराव हरी वैद्य हे अगदी निस्सिम दत्त भक्त, तशीच श्री सद्‌गुरु साईबाबांवर सुद्धा अपार श्रद्धा! ! ज्या आवडीनं श्री गुरुराज दत्तात्रयांना दंडवत घालायचा, तितक्याच भक्तीनं श्री सद्‌गुरुना 'माऊली' म्हणत नमस्कार घालायचा. अगदी खूप नाही जमल तरी दुकानाचा व्याप सांभाळून जितका वेळ प्रभूसेवेत घालविता येईल, तितका वेळ प्रभुसेवा करायचीच.

अशीच एकदा वडिलांची पूजा चालली होती. तोंडाने श्रीगुरूदत्तात्रयांचे व श्रीसाईबाबांचं अखंड नामस्मरण चालू होतं. तोंडानं श्रींचं नाव घ्यायचं व मूर्तीवर फुलांचा अभिषेक करावयाचा. अशी बराच वेळ त्यांची पूजा चालली होती. आणि अचानक काय झालं कुणास ठाऊक, त्यांचा हात अचानक थांबला पुजेतलं सारं लक्ष उडाल्यागत झाल. त्यांची भिरभिरती नजर देवघरातल्या भिंतीवरून सरत-सरत हॉलमधल्या श्रीसाईबाबांच्या तस्बीरीवर विसावली. एक क्षणभरच त्यांची नजर त्या तस्बीरीशी मिळाली असेल, त्यांच्या मनात, खोल कुठेतरी अंतःप्रेरणेने एक आज्ञायुक्त आवाज निनादला –

'चल उठ बेटा, तो फोटो आता पडणार आहे. त्याला आधी सावर–'

वडील पूजा सोडून तस्से उठले. आणि धावतच तस्बीरीपाशी गेले. थरथरत्या हातानी त्या तस्बीरीला त्यांनी स्पर्श केला मात्र अन् खरोखरीच ती सुंदर तस्बीर खिळ्यासह उचकटून त्यांच्या हाती आली.

● ●

---

**श्रीसाईलीलेचे दोन खास अंक एकाच महिन्यात !**

श्रीसाईलीला आक्टोबर अंक खास विजयादशमी अंक म्हणून १ आक्टोबरला प्रसिद्ध होत आहे व दिवाळी अंक २० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होत आहे.

# ब्रह्मीभूत सच्चिदानंद स्वामी महाराज

**ले. गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.**
मिरांडा चाळ, शिवाजी मंदिर समोर, दादर, मुं. २८

'मामनुस्मर युध्यच' हा क्रांतिमंत्र 'एक श्लोकी गीता' ह्या ग्रंथात सांगणारे हे एक कर्मयोगी व साक्षात्कारी संन्यासी होते. ह्यांनी गुरुप्रसादाने प्राप्त झालेला 'प्रणव-प्रकाश' प्रज्वलित ठेवला आणि इंग्रजी सत्तेच्या अमलाच्या प्रारंभी सामान्य जनतेचे प्रबोधन केले. स्वामींचा जन्म इ. स. १८५८ मध्ये पुण्यात एका सुखवस्तू संस्कारसंपन्न ब्राम्हण कुटुंबात झाला. हे पूर्वाश्रमीचे केशव नारायणशास्त्री दामले. इ. स. १८७४ ह्या वर्षी ते पुण्याच्या हायस्कूलात चौथ्या इयत्तेत होते. ह्या काळात दररोज पहाटे नदीवर स्नान करून ते ओंकारेश्वरावर देवास पाणी घालीत. मग नमस्कार घालावयाचा व्यायाम, गायत्रीचा जप आणि बेलबागेतील श्रीमहाविष्णूचे दर्शन, असा त्यांचा क्रम अव्याहत चालू होता.

एकदा पहाटे तीन ऐवजी एक वाजता ते ओंकारेश्वरावर गेले व स्नान करून मंदिरात जपास बसले. जप चालू असता स्वामी देहभान विसरले. त्यांना शेषशायी भगवंताची दिव्य मूर्ती दिसली. त्या तेजोमय मूर्तीने त्यांना मंत्र दिला. 'कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने । प्रणतः क्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः' ह्या दिव्य अनुभूतीची अपूर्वाई ह्या सोळा वर्षाच्या मुलास उमजली नाही.

लवकरच ते पब्लिक सर्व्हिसची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना पोष्टखात्यात नोकरी लागली. त्यानंतर लग्नही झाले. प्रपंचात ते असेच गुरफटले गेले. तीन वर्षांचा काळ गेला. एके दिवशी स्वामी सायंकाळी झोपले असता त्यांना स्वप्न पडले: स्वप्नात एक तेजःपुंज योगी आला. त्याने स्वामीजवळ पेलाभर तेल मागितले. शेजारच्या बिऱ्हाडातील एका मराठ्याच्या कुटुंबातील बाईकडून पंचपात्रीभर तेल मागून स्वामींनी घेतले. कारण घरात बाहेरशीची अडचण होती, आणि ते त्या बैराग्यास दिले. बैरागी संतुष्ट झाला. त्याने स्वामींना, 'आता स्नान करून गायत्रीचा जप कर' असे म्हणून स्वप्नात बैराग्याच्या रूपाने आदिनाथ, शंकर गुप्त झाले. स्वामींचा गायत्रीचा मंत्र पुन्हा सुरू झाला. पण तो कायम टिकला नाही. स्वामींच्या जीवनात प्रारब्ध बलवान ठरले. इ. स. १८७६ पर्यंतचा काळ दुःख-दैन्य भय-भ्रमण, आधि-व्याधि ह्या उपाधित गेला. पुढे जी ग्रंथ-रचना स्वामींच्या हातून झाली त्याची बीजे कळत नकळत त्यांच्या

जीवनात ह्या काळात पेरली गेली होती.

स्वामींना लहानपणापासून वेदान्त विचाराची आवड होती. पोष्टखात्यातील नोकरी काही कारणामुळे सुटली. त्यानंतर आचार्यादिकांच्या ग्रंथात प्रवेश व्हावा म्हणून त्यांनी स्वेच्छेने संस्कृत भाषेचा अभ्यास केला आणि वेदान्तात प्रवीणता संपादन केली.

त्यावेळी केशवानंद ह्या उदासीन पंथाच्या प्रचारकाची व्याख्याने पुण्यात होत होती. त्यांच्या वेदान्तविषयावरील व्याख्यानानी स्वामीजी प्रभावित झाले आणि वेदान्तशास्त्र आत्मसात केल्याशिवाय जीवनाचे रहस्य उमजणार नाही असा त्यांच्या मनाचा पक्का ग्रह झाला; व त्यांचा वेदान्ताचा व्यासंग वाढीस लागला. पंचदशी योगवासिष्ठ ह्या ग्रंथाचा त्यांनी अभ्यास केला. शंकराचार्यांची संस्कृत लघुवाक्यवृत्ति, मुकुंद राजांचा परमामृत ह्या ग्रंथाचे त्यांनी परिशीलन केले. महाराष्ट्रातील साधु पुरुषांचे ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, दासबोध हे प्राकृत ग्रंथ त्यांनी अभ्यासिले. स्वामींना ह्या वाचनाने ह्यानंतरच्या २०।२२ वर्षांचे दीर्घ कालावधीत अनेक दृष्टांत झाले. तीन तपे वेदान्ताच्या व्यासंगात घालविल्यामुळे त्यांची प्रवचने, व्याख्याने, कथा ज्यांनी ज्यांनी ऐकल्या त्यांना त्यांची योग्यता व अधिकार श्रवणानंतर अनुभवास येत असे.

स्वामींनी इ. स. १८९८ ते १९१८ ह्या काळात एकूण लहानमोठे १३ संस्कृत-मराठी ग्रंथ लिहिले आणि जेष्ठ शुद्ध १२, शके १८४१ (इ. स. १९१९) रोजी पुणे येथील नारायण पेठेतील आपल्या 'शेषशायी' मठात वयाच्या बासष्ठाव्या वर्षी समाधिस्त झाले.

त्यांच्या तेरा ग्रंथापैकी 'प्रणव–प्रकाश,' 'गुरुप्रसाद' आणि 'एक श्लोकी गीता' हे तीन ग्रंथ उद्बोधक, शास्त्रशुद्ध व प्रासादिक आहेत. ॐकार हे परब्रम्ह वाचक गूढ अक्षर आहे. ह्या ॐकाराचे रहस्य सरस आणि सतेज भाषेत त्यांनी विवेचिले आहे. ग्रंथाची भाषा सर्वत्र ओघवती, अर्थवाही आणि अगदी आधुनिक आहे. त्यात विद्वत्तेची जडता वा क्लिष्टता नाही. मानवी जीवनात येणाऱ्या अनेक शंकांची, प्रश्नांची उत्तरे त्यात आहेत. मनाचा वेध घेणारा हा ग्रंथ आहे.

'गुरुप्रसाद' ह्या ग्रंथात स्वामींनी अद्वैत वेदान्ताचा गाभाच उलगडून दाखविला आहे. ग्रंथाच्या प्रत्येक पानातून ह्या ग्रंथकाराचा थोर अधिकार जाणवतो. वाचन करीत असता ग्रंथकार वेदान्ताचे थोर अधिकारी आणि साक्षात्कारी संत असल्याचा प्रत्यय येतो. ग्रंथात स्वामी लिहितात, "मोक्ष मोक्ष म्हणजे ब्रम्हभाव. म्हणजे निरतिशय आनंदघन द्वैतभयरहित सर्व विषयसि शून्य अशी जी अखंड स्वयंप्रकाशमान स्व-स्वरूपस्थिती तिलाच मोक्ष असे म्हणावे.

है ते मोक्षाचे लक्षण किंवा स्वरूप आम्ही सांगितले. यात स्वरूपस्थिती हाही एक शब्द काहीसा दुर्बोध वाटेल. तथापि त्यातील भावार्थ इतकाच की ह्या स्थितीत जीवाला अगदी तात्विक स्वातंत्र्य असते. ते प्रत्यक्ष असते. अर्थात आपण आपल्या ठिकाणी आपल्या सात्विक, अपरोक्ष रूपाने अखंड सुखरूप असणे ही स्थिती अद्वैतरूप असल्यामुळे तिला पोचलेल्या सिद्ध पुरुषास कोणाचेही भय उरत नाही. येथे काळाचेही भय नाही. मृत्युचीच येथे चटणी होते. खरोखर अशी स्थिती होणे किंवा असणे हाच गुरुप्रसाद. हेच मुख्य महाफल, हेच जीवित साफल्य, हाच परमपदलाभ, हाच कैवल्यधाम–निवास."

गुरु कसा भेटतो हे सांगताना स्वामी लिहितात, "केवळ बुद्धिमत्ता या दृष्टीने परमार्थ सुखाच्या किंवा मोक्षविद्येच्या शास्त्राकडे एखाद्याची प्रवृत्ती झाली तरी त्याला तो निष्प्रपंच असा ब्रम्हानंद होत नसतो. आणि ज्याला खरी लालसा उत्पन्न होते त्यास मोक्षमार्गदर्शक खरा श्रीगुरूही भेटतो. तो श्रीगुरु वैकुंठात असो, किंवा कैलासात असो, अथवा हिमालयाच्या थंडगार गुहेत तो महात्मा असो, तेथून थेट तो या मुमुक्षूचे घरी नव्हे हृदयगव्हरीच तत्काळ प्रकट होतो आणि या मुमुक्षू जीवाचे कार्य होते."

हा ग्रंथ पाच भागात प्रकाशिला आहे. पहिल्या भागात मोक्षप्राप्तीची साधने त्यावरील वेदशास्त्रांचा निर्णय काय इत्यादींचे विवेचन आहे. दुसऱ्या भागात आत्मानात्मविवेक हा विषय विवरिला आहे. तिसऱ्या भागात आत्मतत्व जाणण्यासाठी अभ्यासक्रम सांगितला आहे. चौथ्या भागात देवाचे स्वरूप काय ह्याचे विवेचन आहे. पाचव्या भागात तत्वबोधाचा प्रकाश टाकला आहे. म्हणजे आपले केवळ सहज सत्चित् सुखरूपच सर्वत्र कसे व्यापून आहे ह्याचे विवरण आहे. स्वामींचे ह्या ग्रंथातील विचार व विवेचन जगद्गुरु श्रीमत शंकराचार्यांच्या मतानुसार झाले आहे.

स्वामींचा 'एकश्लोकी गीता' हा ग्रंथ अपूर्व आहे. "तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च' ह्या आठव्या अध्यायातील सातवा श्लोक म्हणजेच एकश्लोकी गीता भगवद्गीता हा ग्रंथ प्रपंच-परमार्थाचा अक्षय्य प्रदीप आहे. गीतेतील वरील सूत्रभूत श्लोकाचा जो अर्थ तो गीताशास्त्राचा तात्पर्यार्थ असे स्वामींनी ह्या ग्रंथात सांगितले. हा ग्रंथ त्यांनी चतुर्थाश्रम स्वीकारल्यानंतर श्रीशैलक्षेत्री प्रथम संस्कृत भाषेत अनुष्टुप वृत्तात कारिकांची रचना करून लिहिला गीताश्लोकावरील कारिकांची ही रचना प्रसन्न व प्रवाही आहे. त्या कारिका वाचीत असता आपण गीतेचाच रम्य विस्तार पाहात आहोत असा भास होतो. ह्या मूळ स्वलिखित कारिकांच्या आधारे स्वामींनी मराठीत वरील गीता